# Family Court . nagpur

First Floor, Suyog Building, GPO Chowk, Civil Lines, Nagpur-440 001
Ph. 0712-2548923; Email : fcnagpur@bhc.gov.in

---

**परिपत्रक कमांक बी–16(2)/90 /2021**
**दिनांक : 24.03.2021**

संदर्भः. 1. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे पत्र क. Insp-I/23-A/2021 Date 24/03/2021

2. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे पत्र क. Insp-I/20/2021 Date 15/03/2021 व परिपत्रक दिनांक 23/02/2021

3. कार्यालयीन परिपत्रक क. बी–16(2)/09/2021 दिनांक 16/03/2021

मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे उपरोक्त संदर्भ क. 1 व संदर्भ क. 2 वरील पत्राचे अधीन राहून, मी प्रमुख न्यायाधीश, कौटुंबिक न्यायालय, नागपूर खालीलप्रमाणे परिपत्रक/निर्देश निर्गमीत करीत आहे.

1) दिनांक 24/03/2021 ते दि. 09/04/2021 पर्यंत किंवा मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या पुढील आदेशापर्यंत कौटुंबिक न्यायालय, नागपूर च्या आस्थापनेतील सर्व न्यायालयाचे न्यायीक कामकाज दोन सत्रामध्ये खालीलप्रमाणे सुरू राहील.

| | | |
|---|---|---|
| **न्यायीक कामकाज** | **– प्रथम सत्र** | **सकाळी 10.30 ते दुपारी 1.00** |
| | **– द्वितीय सत्र** | **दुपारी 1.30 ते दुपारी 4.00 पर्यंत** |

2) तथापि, सर्व न्यायीक अधिकारी हे सकाळी 10.30 ते दुपारी 4.30 पर्यंत न्यायालयात उपस्थित राहतील व न्यायालयातील प्रशासकीय व इतर कामकाज करतील.

3) न्यायीक अधिकारी हे वरील कालावधीत एखादा पक्षकार व वकील किंवा साक्षदार हजर न राहिल्यास पक्षकार किंवा वकीलांविरूद्ध कोणताही विरूद्ध आदेश करणार नाहीत.

4) न्यायालयीन परिसरात ज्या पक्षकार, वकील, साक्षदार यांची न्यायालयीन कामकाजात व त्या सत्रामध्ये उपस्थिती आवश्यक आहे त्यांनाच प्रवेश देण्यात येईल.

5) पुकारा झाल्याशिवाय कोणतेही वकील, पक्षकार, साक्षदार यांनी न्यायालय कक्षात प्रवेश करू नये. तसेच कामकाज संपल्यानंतर न्यायालय परिसरात विनाकारण थांबु नये.

Comp. Section
(28)

6) कौटुंबिक न्यायालय, नागपूर च्या आस्थापनेवरील सर्व विभागातील कर्मचा–यांची दोन सत्रामध्ये विभागणी करून प्रत्येक सत्रामध्ये 50 टक्के उपस्थिती किंवा मार्च अखेरची वार्षीक कामे करण्याकरीता लागणारे कर्मचारी उपस्थित राहतील.

7) मा. उच्च न्यायालय मुंबई यांच्या दिनांक 27/11/2020 रोजीच्या मार्गदर्शिकेत दिलेल्या सर्व सुचनांचे सर्वांनी पालन करणे वंधनकारक आहे.

(दिनांक 27/11/2020 रोजीची मा. उच्च न्यायालय मुंबई यांची मार्गदर्शिका या परिपत्रकासोबत संलग्न करण्यात आली आहे.)

24.3.2021
(एम.एम.ठाकरे)
प्रमुख न्यायाधीश,
कौटुंबिक न्यायालय, नागपूर

**कमांक : बी–16(2)/243/2021**
**दिनांक : 24 मार्च, 2021**

__प्रतिलिपी सस्नेह सादर अग्रेषीत :–__

1. मा. महाप्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई–400 032
2. मा. प्रबंधक (निरीक्षण–1), उच्च न्यायालय, मुंबई–400 032

__प्रतिलिपी. माहितीकरीता अग्रेषीत :–__

3. प्रमुख न्यायाधीश कौटुंबिक न्यायालय, नागपूर.
4. न्यायाधीश कौटुंबिक न्यायालय क. 2/3/4, नागपूर.
5. अध्यक्ष/सचिव, जिल्हा वकील संघ, जिल्हा व सत्र न्यायालय, नागपूर
6. अध्यक्ष/सचिव, कौटुंबिक न्यायालय वकील संघ, नागपूर
7. विवाह समुपदेशन विभाग, कौटुंबिक न्यायालय, नागपूर
8. न्यायालयीन व्यवस्थापीका, कौटुंबिक न्यायालय, नागपूर
9. प्रवंधक/उपप्रवंधक, कौटुंबिक न्यायालय, नागपूर.
10. अधिक्षक, आस्थापना विभाग/रोख व वित्त विभाग/तांत्रिक विभाग/संगणक विभाग/अभिलेख विभाग, कौटुंबिक न्यायालय, नागपूर

24.3.2021
प्रमुख न्यायाधीश,
कौटुंबिक न्यायालय, नागपूर